# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २१/१०/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | **मागील मा. स्थायी समिती सभा दि. १०/१०/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.** | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. १०/१०/२०१६ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत आले.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज ठाकूर सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| २ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. १०५ मध्ये जुचंद्र येथे आरोग्य केंद्रावर पहिल्या मजल्याचे बांधकाम करणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव:-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'ए' 'बी' व 'सी' कार्यालय हद्दित शालेय विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय कला क्रिडा महोत्सव २०१६ साजरा करणेकामी होणाऱ्या आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत आजच्या स्थायी समितीच्या सभेत सविस्तर चर्चा होऊन महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग समिती 'ए' 'बी' व 'सी' कार्यालय हद्दित शालेय कला-क्रीडा महोत्सव २०१६ स्पर्धेचे आयोजन करण्यास व वर नमुद केलेल्या बाबींसाठी तसेच कला क्रीडासाठी लागणाऱ्या इतर अनुषंगिक बाबींसाठी विहीत कार्यपध्दतींचा अवलंब करून महानगरपालिकेच्या मंजूर ठेकेदाराकडून काम प्रस्तावित केलेली कामे करून घेण्यासाठी येणारा खर्च तसेच कला व क्रीडा स्पर्धासाठी येणारे पंच, परिक्षक, कला शिक्षक व क्रीडा शिक्षक व कलाकार यांचे मानधन रोखीने अदा करणेकामी अग्रीम स्वरुपात रक्कम द्यावी तसेच संपुर्ण कला-क्रीडा महोत्सव २०१६ यशस्वीपणे राबविण्यासाठी येणाऱ्या अंदाजीत रक्कम रु. ४० लक्ष इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफिक शेख सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| | | |

| | | |
|---|---|---|
| ४ | वसई-विरार शहर महानगरपालिका, नालासोपारा क्षेत्रिय कार्यालय हद्दित शालेय विद्यार्थ्यांसाठी "शालेय कला क्रिडा महोत्सव २०१६" साजरा करणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होवून महानगरपालिकेच्या वतीने नालासोपारा शालेय कला क्रीडा महोत्सव २०१६मध्ये प्रभाग समिती ब,ड,ई,व फ क्षेत्रातील शाळेचा समावेश असून प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे १) ध्वनी प्रक्षेपण व विद्युतीकरण २) स्टेज मंडप डेकोरेशन ३) छपाई स्टेशनरी पुरवठा करणे व इत्यादी बाबतची निविदा महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागात मंजूर असून मंजूर ठेकेदाराकडून कामे करणेस तसेच सी.सी.टी.व्ही कॅमेरे कला व क्रीडा विभागात भाड्याने पुरवठा करणेकामी दरपत्रक मागविणेस शाळेकडून प्राप्त होणारे प्रवेश पत्रिकांची डेटा एन्ट्री करणे स्पर्धकांचे आय.डी.कार्ड व स्टीकर तयार करणे इ. कामी दरपत्रक मागविणेस, मैदान सपाटीकरण करणेसाठी लागणारी लाल माती खरेदी करणे कामी बी-२ निविदा प्रक्रियेस व त्या अनुषंगिक बाबींसाठी विविध कार्यपध्दतीचा अवलंब करून कामे करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफिफ शेख  सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| ५ | विषय क्र. ५) प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील सर डी.एम.पेटीट रुग्णालयातील वाढीव व अतिरिक्त विविध कामे तातडीने करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीस व खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव:-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर कामात मूळ अंदाजपत्रकीय रक्कम रू. ३२,५८,९४७/- या रक्कमेपैकी रक्कम रू. २३,७०,६६८/- इतका खर्च झाला असून रक्कम रू. ८,८८,२७९/-शिल्लक असल्याचे दिसून येते. अतिरीक्त बाबी व वाढीव परीमाणा वरील झालेला खर्च रक्कम रू. ५०,०२,६०५/-पैकी मूळ अंदाजपत्रकीय शिल्लक रक्कम रू. ८,८८,२७९/- वजा जाता रक्कम रू. ४१,१४,३२६/- इतका होत आहे. अशाप्रकारे एकूण खर्च रक्कम रू. ७३,७३,२७३/- च्या खर्चास व विभागानी प्रस्तावास नमुद केल्याप्रमाणे मे.मॅनदिप एंटरप्रायजेस या मंजूर निविदा धारकांकडून घेतलेल्या सदरच्या कामास ही सभा कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज ठाकूर  सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| ६ | <u>वसई-विरार शहर</u> महानगरपालिकेच्या ६ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१६ साठी स्पर्धेचे इव्हेंन्ट मॅनेजमेन्ट करणे व त्या अनुषंगिक इतर कामे करणेकामीचे सर्वात कमी दराचे ई-निविदाधारक यांचे दर मंजुर करून त्यांच्याशी करारनामा करणेस कामाचा कार्यादेश देणे याबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव:-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ६ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१६ साठी स्पर्धेचे इव्हेंन्ट मॅनेजमेन्ट करणे व त्या अनुषंगिक इतर कामे करणेकामी प्राप्त ई-निविदेतील सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. आर्यन्ज स्पोर्ट्स पीआर ॲन्ड इव्हेंन्ट यांची ई-निविदा मंजूर करून त्यांच्याशी करारनामा करणेस, कामाचा कार्यादेश देणेस व कामाची होणारी देके अदा करणेंस ही सभा सर्वानुमते मंजूरी दे त आहे. मॅरेथॉन स्पर्धेचे नियोजन करणेकामी आगाऊ रक्कमेची आवश्यकता असल्याने प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मे. आर्यन्ज स्पोर्ट्स पीआर ॲन्ड इव्हेंन्ट यांनी मागणी केल्यास त्यांच्या निविदेतील मंजूर रक्कमेच्या ७५% आगाऊ रक्कम तात्काळ अदा करणेंस ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. तसेच नामंजूर निविदाधारकांस त्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणेंस, ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले  सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |

| | | |
|---|---|---|
| ७ | विषय क्र. ७) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या ६ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१६ साठी आर्ट वर्क (डिझाईन) व इतर अनुषंगिक कामे करणेकामीचे सर्वात कमी दराचे ई-निविदाधारक यांचे दर मंजुर करुन त्यांच्याशी करारनामा करणेस कामाचा कार्यादेश देणे याबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या ६ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१६ साठी आर्ट वर्क (डिझाईन) व इतर अनुषंगिक कामे करणेकामी प्राप्त ई-निविदेतील सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. राजू वनमाळी यांची ई-निविदा मंजूर करुन त्यांच्याशी कामाचा करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणेस, कामाची होणारी देयके अदा करणेंस ही सभा सर्वानमुते मंजूरी देत आहे. तसेच नामंजूर निविदाधारकास त्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणेंस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| ८ | विषय क्र. ८) अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांकरीता गणवेश खरेदीच्या पुनर्विनियोजन प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना गणवेश देणे आवश्यक आहे व त्याकरीता अंदाजपत्रकातील आगीबाबत साधन सामुग्री गणेवशसह या लेखाशिर्षकावरील मुळ तरतुद कमी पडत असल्याने अंदाजपत्रकातील अग्निशमन कर्मचारी, अग्नीशमन व्यवस्थापन ठेका महसुली या लेखा शिर्षामधून रू. २०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. वीस लाख मात्र) आगीबाबत साधन सामुग्री गणवेशसह या लेखा शिर्षकामध्ये पुनर्विनियोजन करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| ९ | विषय क्र. ९) वसई-विरार शहर महानगरपालिका, नालासोपारा कार्यक्षेत्रातील निळेमोरे हद्दितील बाजारकर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त झालेल्या ज्यादा देकाराच्या द्वितीय फेर ई-निविदा स्विकृत करणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील मौजे निळेमोरे येथील दैनिक बाजार कर वसुली कामी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता ८ महिन्यांसाठी प्राप्त झालेल्या द्वितीय फेर ई-निविदा,इतर निविदाधारकांपेक्षा अंजली ट्रेडर्स कंपनी यांची रक्कम रू. १८,४५,०००/- ची सर्वात जास्त देकाराची निविदा प्राप्त झाली आहे. सदर ८ महिन्यांमधील ३ महिन्यांची रू. ६,९१,८७५/- इतकी रक्कम मागील वर्षातील मंजूर ठेकेदारास दिलेल्या मुदतवाढीनुसार वसुल करणेंत यावी. तसेच पुढील ५ महिन्यांकरीता होणारी रू. ११,५३,१२५/- इतकी रक्कम अंजली ट्रेडर्स कंपनी यांचेकडून वसुल करणेसाठी प्राप्त झालेली निविदा मंजूर करण्यांत येत असून संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |

| | | |
|---|---|---|
| १० | विषय क्र. १०) प्रभाग समिती ड वॉर्ड नं. ६३ (९०) मध्ये वालीव येथे तारकेनगर शाळेमागे १२ सीटचे शौचालय बांधणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे सरस्वती एंटरप्रायजेस यांची ३.००% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. सरस्वती एंटरप्रायजेस यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| ११ | विषय क्र. ११) प्रभाग समिती "जी" मधील फुटपाथ डिव्हायडर्स दुरूस्ती व रंगकाम करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दरांची निविदा मंजुर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** मे. ओमकार एंटरप्रायजेस यांची वाटाघाटी नंतर प्राप्त अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३.०% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत आहे असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अफिफ शेख सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| १२ | विषय क्र. १२) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'आय' वसई विभागातील कै. डॉ. धोडो गोविंद अभ्यंकर स्मृती ग्रंथालय व वाचनालयामार्फत दिवाळी संध्येच्या निमित्ताने "गंधार" या मराठी-हिंदी गाण्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक मंजुर प्रदान करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात सन २०१६/१७ या वित्तीय वर्षासाठी प्रभाग समिती (आय) वसई करीता सत्कार, वसई विजयोत्सव समारंभ, व्याख्यान माला, वकृत्व स्पर्धा, ग्रंथ संमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम या लेखा शिर्षातर्गत रक्कम रू. २०,००,०००/- (अक्षरी रक्कम रू. वीस लक्ष) इतकी तरतुद केलेली आहे. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पुर्ण करण्यासाठी लागणारे फ्लॅक्स, बॅनर, स्टेज बॅनर, निमंत्रण पत्रिका, शाल व श्रीफळ, पुष्प गुच्छ/(तुळशीचे रोपटे), गुलाबाची फुले, स्मृतीचिन्ह, चहा व कॉफी, पिण्याचे सिलबंदपाणी ) जार व बाटल्या, नाश्ता (दिवाळी फराळ), जेवण, कलाकार मानधन( ७५,०००/-), फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग, खुर्च्या, साऊंड सिस्टीम(डि.जे.माईक), (कॉलर माईक), स्टेज व बैठक (गाद्याची बैठक), कलर बॅक ड्रॉप, कारपेट, लाकडी टेबल, पणत्या, आरतीचे सामान, (मेणबत्ती, समई, फुले, हळदकुंकु), दिपप्रज्वलन, जनरेटर भाड्याने पुरविणे इत्यादी साहित्य महानगरपालिकेच्या मंजूर निविदाधारकांकडून उपलब्ध करून देण्यास तसेच बॅनर व पत्रिका डिझायनिंग, पणत्या, तेल, वात व आकाश कंदील खरेदी करणे इतर किरकोळ साहित्य साहित्य खरेदी करणे इ. साहित्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांच्या नांवे अग्रीम रक्कम देणेकामी तसेच सदर कार्यक्रमाचे रक्कम रू. ७५,०००/- मानधन अदा करणेकामी षडज्-पंचम या संस्थेच्या नावाने धनादेशाद्वारे अदा करण्यास तसेच कार्यक्रमाच्या प्रसिध्दी करीता वर्तमानपत्रात जाहिरात देणेकामी येणाऱ्या खर्चास तसेच कार्यक्रमाशी |

| | | |
|---|---|---|
| | | संबंधित होणाऱ्या इतर अनुषंगिक बाबींवर होणाऱ्या खर्चासाठी संपुर्ण कार्यक्रम करण्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ५ लक्ष इतक्या खर्चास आजची मा.स्थायी समितीची सभा प्रशासकीय व वित्तीय व तांत्रिक मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |